**नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २३६/१५ मधील नि. क्र. ४३ येथील अर्जावरील आदेश**

वादींनी प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहीता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादी क्र. १, २, ४ आणि ५ यांनी म्हणणे दाखल करुन अर्जास प्रतिरोध केला आहे.

प्रस्तुत अर्ज, अर्जासोबतचे नि.क्र.४४ येथील शपथपत्र, अर्जावरील प्रतिवादी क्र. १, २, ४ आणि ५ यांचे म्हणणे आणि अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. उभय पक्षांच्या सन्माननीय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले.

अर्जामध्ये व शपथपत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे की, दावा हा प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी मोतीलाल रसुल आतार हा मयत झाला असून तो मयत होण्यापुर्वी दावा मिळकतीचे सात बारा उता–यावरती त्याचे नाव असल्याचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीचा खरेदीचा दस्त आगतराव सयाप्पा माने व गोरख काशिनाथ तामखडे यांच्या नावे नोंदवुन दिलेला आहे, त्यामुळे त्यांना दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणे व त्याबाबतचा मजकूर परिच्छेद क्र. ३ नंतर परिच्छेद क्र. ३अ असा नमूद करुन दुरुस्ती करण्यास परवानगी दयावी. प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांनी असा आक्षेप घेतला आहे की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असल्याने नामंजूर करावा . अर्ज मंजूर करण्यास आल्यास खर्च देणेबाबत आदेश करण्यात यावा.

वादपत्राचे अवलोकन करता वादींनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेबाबत दाखल केला आहे. अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ नि.क्र. ४४ चे शपथपत्र दाखल केले. वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीचे अवलोकन करता अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे सुचित केलेली दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुपामध्ये बदल होईल व प्रतिवादीपक्षाचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे अशी परिस्थिती दिसून येत

नाही. प्रस्तूत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी पक्षाचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाही कारण प्रस्तावित दुरुस्तीबाबत म्हणणे देण्याची व त्याबाबतच्या पुराव्यास आव्हान देण्याची संधी त्याना भविष्यात उपलब्ध असेल. प्रतिवादीपक्षाने नमूद केलेले आक्षेप प्रस्तूत अर्ज नामंजूर करणेइतपत सबळ नाहीत. प्रस्तूत अर्ज नामंजूर केल्यास वादीपक्षाचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रस्तूत प्रकरणातील उभय पक्षांमधील वादांचे पुर्णपणे निराकरण करणेकामी वादींनी प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांना प्रत्येकी रु. ५०/– असे एकूण २००/– रुपये खर्च देण्याचे अटीवर प्रस्तावित केलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. त्यामुळे उपरोक्त नमूद विश्लेषणाचे काळजीपूर्वक अवलोकन करता प्रस्तूत अर्जाद्वारे वादपत्रामध्ये दुरुस्ती करणेबाबत वादींनी केलेली विनंती खर्च देण्याचे अटीवर मंजूर करणे क्रमप्राप्त ठरेल. परिणामतः मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तूचा अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांना पुढील तारखेपर्यत प्रत्येकी रु. ५०/– असे एकूण २००/– रुपये रुपये खर्च देण्याचे अटीवर अर्जामध्ये प्रस्तावित केलेली दुरुस्ती वादपत्रामध्ये करण्यास त्याना परवानगी देण्यात येते.

३. वादींनी येणेप्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्त करुन दुरुस्त अर्जाच्या आवश्यक प्रती अभिलेखावर सादर कराव्यात.

४. प्रस्तूतच्या आदेशाचे निवेदन खुल्या न्यायासनासमोर अधिघोषीत केले.

**(सचिन स.पाटील)**

दिनांकः १५.०२.२०१९ **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Shri. S.S. Patil,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 15.02.2019 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 15 .02.2019 |